## कीटकनाशके फवारणी करतांना  घ्यावयाची काळजी

### फवारणी करतांना  घ्यावयाची काळजी

- कीटकनाशक  वापरण्यापूर्वी  लेबल व माहिती पत्रक वाचून खबरदारीच्या सर्व सूचनांचे पालन करावे.
- डब्यावरील  लाल  रंगाचे पतंगीच्या  आकाराचे चिन्ह असलेली कीटकनाशके  सर्वात विषारी त्यानंतर पिवळा ,निळा व हिरवा असा क्रम लागतो. हि चिन्हे सोपी व सर्वसाधारण ,निरक्षर व्यक्तीसाठी समजण्यासाठी असतात .म्हणजेच हिरव्या रंगाचे चिन्ह असलेली कीटकनाशके कमीत कमी विषारी असतात.
- तणनाशके फवारणीचा पंप चुकूनही कीटकनाशके फवारणीसाठी वापरू नये.
- फवारणी करतांना संरक्षक कपडे ,बुट ,हातमोजे ,नाकावरील मास्क इत्यादीचा वापर करावा.

### बाधित  व्यक्तीची घ्यावयाची काळजी.

- कीटकनाशक पोटात गेल्यास किंवा त्वचा ,डोके,श्वसनेंद्रिया  द्वारे विषबाधा होऊ शकते.
- व्यक्तीस विषबाधा  झाल्यास झाल्यास अपघात स्थानापासून दूर न्यावे. त्याच्या अंगावरील कपडे सैल करून बदलावे.
- रोग्याचे अंग /बाधित अवयव ताबडतोब साबण लावून स्वच्छ पाण्याने धुवावे. व कोरड्या टॉवेलने पुसावे.
- कीटकनाशक पोटात गेलेले असल्यास रोग्याला ताबडतोब ओकारी करण्याची उपाय योजना करावी.
- रोग्याला पिण्यासाठी बिडी / सिगारेट व तंबाखू देऊ नये.
- रोग्याला जास्त घाम येत असल्यास कोरड्या टॉवेलने पुसावे व कपडे सैल करावे.
- रोग्याला थंडी वाजत असल्यास अंगावर पांघरून ध्यावे.
- रोग्याचा श्वासोच्छवास योग्य रीतीने सुरु आहे का ते तपासावे.
- रोग्याचा श्वासोच्छवास अनियमित किंवा बंद  झाल्यास त्वरित रोग्याच्या तोंडाला तोंड लावून कृत्रिम श्वासोच्छवास सुरु करावा.
- रोग्याला झटके येत असल्यास त्याच्या दातांमध्ये मऊ  कापडाची छोटी गुंडाळी टाकावी.
- रोगी बेशुद्ध पडल्यास त्याला शुद्धीवर आणावयाचे प्रयत्न करू नये.
- बेशुद्ध रोग्याला काहीहि खाऊ घालण्याचे प्रयत्न करू नये.
- रोग्याला त्वरित कीटकनाशकाच्या माहितीपत्रकासह डॉक्टरांकडे  घेऊन जावे. डॉक्टरांच्या निगराणीत उपचार करावे.
- रोगी बरा झाल्यावर त्याची संपूर्ण वैद्यकीय तपासणी करून घ्यावी.

अधिक माहिती करीता कृषी विद्यापीठातील तज्ञ तसेच वैद्यकीय अधिकारी / डॉक्टर यांचेशी संपर्क साधावा.